# बहिणाअीचीं गाणीं

**कै. बहिणाबाअी चौधरी**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

A 133

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**बहिणाअीचीं गाणीं : कै. बहिणाबाअी चौधरी**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ ११०/-



# बहिणाआीचीं गाणीं

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| ❍ आदिमाया | ....... | ७ |
| ❍ माहेर | ....... | ९ |
| ❍ कशाला काय म्हनूं नहीं? | ....... | ११ |
| ❍ संसार | ....... | १४ |
| ❍ घरोट (जातें) | ....... | १६ |
| ❍ मन | ....... | १९ |
| ❍ हिरीताचं देनं घेनं | ....... | २१ |
| ❍ लपे करमाची रेखा | ....... | २३ |
| ❍ वाटच्या वाटसरा | ....... | २५ |
| ❍ शेतीचीं साधनें | ....... | २८ |
| ❍ आला पाऊस | ....... | ३० |
| ❍ पेरनी | ....... | ३२ |
| ❍ देव अजब गारोडी | ....... | ३४ |
| ❍ कापनी (कापणी) | ....... | ३६ |
| ❍ रगडनी (मळणी) | ....... | ३८ |
| ❍ उपननी | ....... | ४० |
| ❍ मोट हाकलतो एक | ....... | ४२ |
| ❍ गाडी जोडी | ....... | ४३ |
| ❍ गुढी उभारनी | ....... | ४५ |

- आखजी (अक्षय्य तृतिया) ....... ४७
- पोया (पोळा) ....... ५०
- गोसाई ....... ५३
- जयराम बुवाचा मान ....... ५६
- खोकली माय ....... ६१
- काय घडे आवगत ....... ६४
- आप्पा महाराज ....... ६७
- आली पंढरीची दिंडी ....... ७०
- विठ्ठल मंदिर ....... ७२
- खरा देवा मधी देव ....... ७४
- मानूस ....... ७६
- पिलोक (प्लेग) ....... ७८
- चुल्हा पेटता पेटेना ! ....... ७९
- स्फुट ओंव्या ....... ८२
- कांहीं व्यक्तिचित्रें ....... ८९
- धरत्रीले दंडवत ....... १००
- शब्दांचे अर्थ ....... १०२


+++

# आदिमाया

आशी कशी येळी व माये, अशी कशी येळी?
बारा गाडे काजळ कुंकू
पुरल नहीं लेनं
साती समदूराचं पानी
झालं नही न्हानं
आशी कशी येळी व माये, आशी कशी येळी?
धरतीवरलं चांदी सोनं
डागीन्याची तूट
आभायाचं चोयी लुगडं
तेभी झालं थिटं
आशी कशी येळी व माये, अशी कशी येळी?
इडा पिडा संकटाले
देल्हा तूनें टाया
झाल्या तुझ्या गयामंधीं
नरोंडाच्या माया

आशी कशी येळी व माये, आशी कशी येळी ?

बरह्मा इस्नू रुद्र बाळ
खेळईले वटीं
कोम्हायता फुटे पान्हा
गानं आलं व्होटीं

आशी कशी येळी व माये, आशी कशी येळी ?

नशीबाचे नऊ गिऱ्हे
काय तुझ्या लेखीं ?
गिऱ्ह्यानाले खाईसनी
कशी झाली सुखी ?

आशी कशी येळी व माये, आशी कशी येळी ?

नऊ झनासी खाउन गेली
सहज एक्या गोष्टी
दहाव्याशी खाईन तव्हां
कुठें राहिन सुष्टी

आशी कशी येळी व माये, आशी कशी येळी ?

✦✦✦

## माहेर

बापाजीच्या हायलींत
येती शेट शेतकरी
दारीं खेटराची रास
घरीं भरली कचेरी
गांवामधी दबदबा
बाप महाजन माझा
त्याचा कांटेतोल न्याव
जसा गांवामधीं राजा
माय भीमाई माऊली
जशी आंब्याची साऊली
आम्हाईले केलं गार
सोता उन्हांत तावली
तुझे भाऊ देवा घरीं
नहीं मायबाप तुले
तुले कशाचं माहेर
लागे कुलूप दाराले
भाऊ 'घमा' गाये घाम
'गना' भगत गनांत

‘धना’ माझा लिखनार
गेला शिक्याले धुयांत
आम्ही बहीनी ‘आह्यला’
‘सीता, तुयसा, बहीना’
देल्या आशीलाचे घरीं
सगेसाई मोतीदाना
लागे पायाले चटके
रस्ता तापीसनी लाल
माझ्या माहेराची वाट
माले वाटे मखमल
जीव व्हतो लाही लाही
चैत्र वैसागाचं ऊन
पाय पडतां ‘लौकींत’
शीन जातो निंघीसन
तापीवानी नही थडी
जरी वाहे थोडी थोडी
पानी ‘लौकी’चं नित्तय
त्याले अम्रीताची गोडी
माहेरून ये निरोप
सांगे कानामंधी वारा
माझ्या माहेराच्या खेपा
‘लौकी’ नदीले विचारा!

✦✦✦